पान १ वरुन

## सर्वच आरोपी निर्दोष

(अ) (दोन धार्मिक गटांमध्ये शत्रुत्व वाढवणे) आदी भादंविच्या विविध कलमांसह दहशतवादाच्या आरोपांतर्गत आरोप निश्‍चित केले आणि खटल्याच्या नियमित सुनावणीला सुरूवात केली होती.सलग सात वर्षे सुनावणी झाली. सात वर्षांच्या प्रदिर्घ सुनावणीनंतर न्यायालयाने १९ एप्रिल २०२५ रोजी फिर्यादी आणि आरोपींचा युक्तिवाद पूर्ण झाल्याचे जाहीर करून खटल्याचा निर्णय राखून ठेवला होता. न्यायालयाने ३१ जुलै निकालाची तारीख निश्‍चित केली. त्यानुसार सर्व आरोपींना पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले.तसेच बॉम्बस्फोटातील बळींच्या कुटुंबियांना २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपये सरकारने द्यावेत असे आदेशही न्यायालयाने दिले.

## माणिकराव कोकाटेंना अखेर ‘रमी’ भोवली!

खांदेपालटाचा निर्णय झाला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात कोकाटे यांची मोबाईलवर रमी खेळतानाची चित्रफीत व्हायरल झाली. या चित्रफितीमुळे कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अजित पवार यांनी कोकाटे यांना कडक समज देऊन त्यांचे मंत्रिपद काढून घेण्याऐवजी खाते बदलण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राष्ट्रवादीची विनंती मान्य करत हा बदल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना कळविला असल्याचे समजते.

## मायलेकाची हैदोस सावकारी

किर(वय ४५) हिच्याकडे चौकशी सुरु असल्याचे कळते.

नाशिकरोडच्या शिखरेवाडीत ५० वर्षीय महिला पतीसह वास्तव्यास असून तिने सन २०१८ मध्ये फळ विक्रीसह शिवणकाम साहित्यासाठी ओळखीतून अवैध सावकार किर यांच्याकडून सन २०१८ मध्ये पाच लाख रुपये व्याजाने घेतले होते. मात्र, किर मायलेकांसह खान नावाच्या संशयिताने संगनमत करुन तक्रारदार महिलेकडून वेळोवेळी व्याजाने पैसे उकळणे सुरु ठेवले. दरम्यान, संशयितांनी अवैध व्याज वसूलीच्या नादातून सर्वच सीमा पार करुन तिला धमकावून अखेरच्या टप्प्यात घरात शिरुन मारहाण केली. त्यातच, व्याजाच्या रकमेसाठी सारिका किर, तिचा मुलगा अमन किर व खान हे २९ जुलै रोजी पन्नास वर्षीय पीडितेच्या भाडेतत्वाववरील खोलीत बळजबरीने शिरले. त्यांनी तिला व तिच्या पतीस कोंडून अश्‍लिल शिविगाळ करत अमानुष मारहाण केली. त्यातच संशयितांनी तिला अश्‍लिल स्पर्श करुन विनयभंग केला, असे फिर्यादीत नमूद आहे.

अमानुष मारहाणीनंतर, संशयितांनी पीडित महिलेस कारमध्ये जबरीने बसवून तिला व पतीला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. अपहरण करुन दोन लाख रूपयाच्या खंडणीची मागणी केली. माहिती कळताच उपनगरचे वरिष्ठ निरीक्षक जयंत शिरसाठ, सहायक निरीक्षक कल्पेश दाभाडे व डीबी पथक दाखल झाले. संशयित खानचा शोध सुरु असल्याचे दाभाडे यांनी सांगितले.

## मनपातील ‘लाडके भाऊ’ वाऱ्यावर

नाशिक महापालिकेत सुमारे दिडशे लाडके भाऊ यांना नोकरी मिळाली होती, मात्र मागील तीन महिन्यांपासून त्यांना पगार मिळत नसल्याने त्यांच्या समोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे लाडक्या भाऊंचा पगार थेट शासनामार्फत होत असल्याने मनपाने याबाबत आपले हात झटकले आहेत. लाडके भाऊ जे पदवीधर आहेत त्यांना मनपाच्या विविध विभागात सामावून घेण्यात आले आहे. ऑक्टोबर २०२४ ला त्यांनी कामाला सुरूवात केली होती. त्यांना दर महिन्याला दहा हजार रुपये पगार मिळतो. राज्यातील लाडकी बहीण योजनेत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येत असून, त्याचे अनुदान थेट बँक खात्यात जमा होते. दुसरीकडे, लाडका भाऊ योजना ही शासकीय कार्यालयांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात पदवीधर आणि अर्धशिक्षित मुलांना ठराविक निकषांनुसार नोकरीची संधी देणारी योजना आहे. सुरुवातीस या योजनेची कालमर्यादा सहा महिन्यांसाठी होती. मात्र त्यात कालांतराने वाढ करण्यात आली आणि अनेक युवक-युवतींची ही तात्पुरती नियुक्ती अद्याप सुरू आहे. सध्या त्यांना पाच महिन्यांसाठी नेमणूक मिळालेली आहे. मात्र मागील एप्रिल, मे व जुन २०२५ या महिन्यांचा पगारच मिळालेला नाही.

नाशिक महापालिकेत सुमारे १५० लाडके भाऊ नियुक्त करण्यात आले आहेत. हे युवक महापालिकेच्या प्रशासन, स्वच्छता, आरोग्य, अभियांत्रिकी, जनसंपर्क, घनकचरा अशा विविध विभागांमध्ये काम करीत आहेत. त्यांना साधारणपणे दरमहा १० हजार रुपये पगार (मानधन) मिळण्याचे निश्‍चित करण्यात आले होते. मात्र, मागील तीन महिन्यांपासून या कर्मचाऱ्यांना एकही वेतन न मिळाल्याने मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## जेलरोडवर दरोडेखोरांचा थरार

वाजता चार अज्ञात इसम निळ्या रंगाचे रेनकोट, डोक्यावर हेल्मेट आणि हातात हॅन्डग्लोज घालून त्यांच्या बंगल्याच्या कंपाउंडमध्ये शिरले. त्यानंतर त्यांनी दरवाजा ठोठावला असता पगारे यांना सांगितले की, तुमच्या एसीची तक्रार आली आहे, मात्र आम्ही तशी कुठली तक्रार केलेली नाही असे पगारे यांनी सांगितले. मात्र त्यानंतर या दरोडेखोरांनी दमदाटी करून जबरदस्तीने घरात प्रवेश केला. पगारे यांनी विरोध केला असता, एका चोरट्याने त्यांच्या मानेजवळ चाकू लावत जखमी केले, तर दुसऱ्याने पिस्तूलचा धाक दाखवला. त्यानंतर त्यांचे हातपाय व तोंड चिकटपट्टीने बांधले. दुसऱ्या मजल्यावर असलेल्या सुनेलाही खोलीत कोंडून तिचे हात व तोंड बांधले. घरात काही मौल्यवान वस्तू तसेच सोन्या-चांदीचे दागिने किंवा रोख रक्कम मिळते की काय म्हणून त्यांनी शोधाशोध सुरु केली. त्यानंतर पगारे यांना विचारले की, पैसे व दागिने कुठे आहे. आमच्याकडे काहीच नाही, असे पगारे यांनी सांगताच यानंतर दरोडेखोरानी घरातील कपाटे फोडली, मात्र त्यांना पैसे किंवा दागिने काहीच मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी चार पिशव्यांत कपडे, साड्या, मुलांचे कपडे व इतर सामान भरून घेतले. तसेच सीसीटीव्ही यंत्रणेचा युनिटही सोबत घेऊन सर्व चोरटे फरार झाले.

घटना घडल्यानंतर काही वेळातच पगारे यांनी स्वतःची सुटका करून घेतली व त्यानंतर सूनेचे हात सोडवत तिला मुक्त केले व त्यानंतर त्यांनी डायल ११२ वर फोन करून पोलिसांना घरात चोरटे आल्याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आहे. मात्र, दरोडेखोरांनी यंत्रणाच चोरून नेल्याने त्यांचे चेहरे वा हालचाली टिपता आल्या नाहीत. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात रामदास पगारे यांनी चार अज्ञात इसमांविरोधात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## सुधारित आरक्षण

विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गाची प्रचलित आरक्षणाची टक्केवारी आणि लोकसंख्या विचारात घेऊन गट-क आणि गट-ड संवर्गातील सरळसेवा भरतीसाठी सुधारित आरक्षण निश्‍चित करण्यात आले होते. त्यानंतर या सुधारित आरक्षणानुसार बिंदूनामावली देखील विहित करण्यात आली होती.राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अन्वये सामाजिक शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (एसईबीसी) प्रवर्गास शासकीय सेवेतील सरळसेवा पदभरतीस तसेच शैक्षणिक संस्थांतील प्रवेशास १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

**असे असेल आरक्षण**

नाशिक, धुळे, नंदुरबार आणि पालघर या प्रत्येक जिल्ह्यात अनुसूचित जातींसाठी १०%, अनुसूचित जमातींसाठी २२%, विमुक्त जाती (अ) साठी ३%, भटक्या जमाती (ब) साठी २.५%, भटक्या जमाती (क) साठी ३.५%, भटक्या जमाती (ड) साठी २%, विशेष मागास प्रवर्गासाठी २%, इतर मागास वर्गासाठी १५%, एसईबीसीसाठी ८%, ईडब्ल्यूएससाठी ८% आणि खुला प्रवर्गासाठी २४% आरक्षण विहित करण्यात आले आहे.